सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
ज्ञानगंगा घरोघरी
गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222
दूरध्वनी : 0253-2231479 फॅक्स :2231716
संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac
परीक्षा व नोंदणी विभाग

जा.क्र. : पनिका/2017/ दिनांक : 11.11.2017.

शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील पूर्वतयारी शिक्षणक्रम जून-सप्टेंबर 2017 तुकडीच्या ऑनलाईन परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रथम वर्ष प्रवेशाबाबत महत्वाच्या सूचना

विद्यार्थी मित्रहो,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पूर्वतयारी शिक्षणक्रम **जून-सप्टेंबर 2017 तुकडीच्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा दिनांक** 12 ते 14 नोव्हेंबर 2017 या **तारखेला होत आहे. ह्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल आपले प्रथमतः अभिनंदन.**

संबंधित विद्यार्थ्यांसाठी ह्याच सत्रातील प्रथम वर्ष बी.ए. आणि बी.कॉम., वृत्तपत्रविद्या पदवी (बीसीजे) शिक्षणक्रमाला प्रवेश ऑनलाईन आपणांस घेता येईल. ह्या व्यतिरिक्त कोणत्याही शिक्षणक्रमाचे प्रवेश सुरू असणार नाही याची कृपया आपण नोंद घ्यावी. सदरची सोय ही पूर्वतयारी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ही विशेष सोय आहे.

पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्णतेनंतर प्रवेशासाठी बी.ए., बी.कॉम. व्यतिरिक्त इतर प्रथम वर्षाचे शिक्षणक्रम सत्र पध्दतीचे असून संबंधित शिक्षणक्रमांची परीक्षा दिनांक 30 डिसेंबर 2017 पासून सुरू होत असल्याने तांत्रिकदृष्ट्या संबंधित प्रवेश होऊ शकणार नाहीत.

प्रवेशाचा कालावधी **दिनांक 12.11.2017 ते 30.11.2017 विना विलंब शुल्क** असेल. ह्यानंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशाचा कालावाधीची मुदतवाढ होणार नाही. तसेच सर्व प्रवेश प्रक्रिया यानंतर आपोआप बंद होईल. ऑनलाईनव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे प्रवेश होणार नाहीत अथवा विद्यापीठाकडे मागणी देखील करू नये. तरी आपण लवकरात लवकर प्रवेश घ्यावा. प्रथम वर्षाला प्रवेश घेताना खालील बाबींची काळजी घ्यावी.

1. आपल्या पूर्वतयारी शिक्षणक्रमाच्या युजर आयडी आणि पासवर्डच्या आधारे अथवा कायमनोंदणी क्रमांकाद्वारे ऑनलाईन प्रवेशद्वाराच्या दुसऱ्या खिडकीतून प्रवेश घ्यावयाचा आहे. शक्य न झाल्यास नवीन युजरने प्रवेश घेतला तरी चालेल.
2. प्रवेशाच्यावेळी पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्याचे वय 18 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. ह्याव्यतिरिक्त 12 वी उत्तीर्ण अथवा प्रवेश पात्रता धारकास देखील प्रवेश करता येऊ शकेल.
3. प्रवेश घेताना आपण पात्रतेच्या ठिकाणी (इलिजीबीलिटी) आपणास मिळालेले पूर्वतयारीचे उत्तीर्ण असलेले गुणपत्रक स्कॅन करून टाकावयाचे आहे.
4. आपल्या स्वेच्छेनुसार कार्यरत असलेल्याच अभ्यासकेंद्रावर प्रवेश घ्यावा. अभ्यासकेंद्रावर माहिती घेतल्याशिवाय प्रवेश करू नये. अन्यथा चुकीच्या ठिकाणी ऑनलाईन प्रवेश होऊ शकतो.
5. प्रथम वर्षासाठी प्रवेश ऑनलाईन घेऊन शुल्क देखील नेटबँकिंगन्वये ऑनलाईन भरावयाचे आहे.

उपरोक्त बाबी प्रवेश घेताना काळजीपूर्वक वापरात आणाव्यात आणि प्रवेश तात्काळ करावा. आपणाकडून सहकार्याची अपेक्षा. धन्यवाद.

आपला विश्वासू,

प्रा.(डॉ.)अर्जुन पी. घाटुळे
परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीसाठी - 1. मा. कुलगुरू, यचममुविद्यापीठ, नाशिक, 2. मा. कुलसचिव, यचममुविद्यापीठ, नाशिक, 3. मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, 4. मा. संचालक, विभागीय केंद्र - अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड., 5. मा. केंद्रसंयोजक यचममुवि, तत्सम अभ्यासकेंद्र यांना विनंती की आपल्या केंद्रावरील विद्यार्थ्यांचे प्रवेश उपरोक्तप्रमाणे वेळेत करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करावी ही विनंती.